महाराष्ट्र शासन
# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर
पत्ता : ०१, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
गांधी चौक, लातूर, महाराष्ट्र - ४१३५१२ दूरध्वनी : ०२३८२-२५५ २७५
संकेतस्थळ: https://www.vdgmclatur.org

जा.क्र. विदेशावैमला/संकेतस्थळसुरक्षापरीक्षण/6703/२०२६ दिनांक: 06 /०८/२०२६

## संकेतस्थळांची सायबर सुरक्षा लेखापरीक्षणासाठी ई-दरपत्रक आमंत्रण सूचना.
## (२ लिफाफा पद्धतीने)

शासनाच्या संकेतस्थळांची सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याच्या अनुषंगाने तसेच शासन व CERT-In यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक शासकीय संकेतस्थळाचे वेळोवेळी Vulnerability Assessment and Penetration Testing (VAPT) द्वारे सुरक्षा लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अंतर्गत संस्थांचे अधिकृत संकेतस्थळाचे सुधारित VAPT Security Audit पूर्ण करण्यासाठी व Security Audit Clearance Certificate सुरक्षा प्रमाणपत्र व प्रमाणीकरण काम करण्याकरिता **ई-दरपत्रक.**

**विषय : विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर अधिकृत संकेतस्थळ https://www.vdgmclatur.org चे सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी CERT-IN मान्यताप्राप्त संस्थांकडून सीलबंद ई-दरपत्रक मागविण्या बाबत सूचना.**

**संदर्भ :** संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाचे (Website) सुरक्षा लेखापरीक्षण (VAPT Audit) करून सुरक्षा मंजुरी प्रमाणपत्र (Security Audit Clearance Certificate) सादर करण्याबाबत.
मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक
**जा.क्र. डीएमईआर३/२०- ०/० आयुक्त/४०५६ दिनांक: ०४/०८/२०२६**

**निविदा दोन लिफाफ्यात सादर कराव्यात जसे लिफाफा १ (तांत्रिक कागदपत्रे) व लिफाफा २( आर्थिक) हे दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यात सीलबंद करून दि. १४/०८/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावेत. निविदा उघडण्याची वेळ दि. १४/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आहे.**

**ई-दरपत्रकात मागविण्यात येत असलेल्या सेवेची माहिती**

| अनु क्र. | सेवेचे नाव | वर्णन / तपशील | प्रमाण | गंतव्य |
|---|---|---|---|---|
| १ | Website चे Security Audit | संकेतस्थळाचे सर्व स्तरांवरील सुरक्षा लेखापरीक्षण, अहवाल तयार करणे, शिफारसी देणे व सुरक्षा प्रमाणपत्र जारी करणे (परिशिष्ट-अ नुसार) | एकत्रित | लातूर |

- सदर दरपत्रक दस्तऐवजाच्या **परिशिष्ट-अ** मध्ये तांत्रिक तपशील दिलेले आहेत.



Scanned with OKEN Scanner

**ई-दरपत्रक अबाबत अटी व शर्ती :**

१. अंतिम मुदत आणि वेळेनंतर कोणतेही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
२. केवळ माहिती सुरक्षा ऑडिटसाठी केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र शासन CERT-च्या पॅनेलवर नोंदणीकृत असलेल्या संस्था/कंपन्याच कोटेशन सादर करण्यास पात्र आहेत
३. ईमेल/फॅक्स/ऑनलाइन पद्धतीने आलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.
४. निवडलेली एजन्सी कोणतेही काम दुसऱ्या एजन्सीला आउटसोर्स / हस्तांतरित करणार नाही.
५. उद्धृत केलेले दर, प्रस्ताव सादर करण्याच्या अंतिम तारखेपासून ९० दिवसांसाठी वैध असावेत.
६. सुरुवातीला कंत्राट १ वर्षासाठी दिले जाईल आणि सेवेच्या गुणवत्तेनुसार त्याच दराने पुढील वर्षासाठी त्याची मुदतवाढ दिली जाऊ शकते. अशा जास्तीत जास्त २ मुदतवाढी दिल्या जातील आणि कंत्राटाचा एकूण कालावधी ३ वर्षांचा असेल.
७. निवडलेली एजन्सी सुरक्षा ऑडिटच्या निष्कर्षांची गोपनीयता राखेल आणि हे सुनिश्चित करेल की निष्कर्ष आणि सुधारणात्मक कृती प्रकल्पाच्या संबंधित हितधारकांपर्यंत पोहोचवल्या जातील.
८. वेळापत्रक: वेबसाइट ऑडिट अहवालाची पहिली फेरी डीटीईने कार्यादेश जारी केल्यापासून १० दिवसांच्या आत आमच्या संस्थेत सादर करावी आणि त्यानंतरच्या फेरीचा अहवाल (असल्यास) ५ दिवसांच्या आत सादर करावा.
९. निविदाकार, त्यांची इच्छा असल्यास, किंवा त्यांचे प्रतिनिधी, निविदा उघडण्याच्या वेळी उपस्थित राहू शकतात.
१०. अधिकृत शासकीय / निमशासकीय विभागाद्वारे काळ्या यादीत टाकलेल्या कोणत्याही फर्म/संस्थेचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही आणि तो प्रस्ताव सरळ नाकारला जाईल.
११. निविदाकाराने रीतसर स्वाक्षरी केलेले, सोबत जोडलेल्या अटी व शर्तींची आणि कामाच्या व्याप्तीची एक प्रत. त्याच्या स्वीकृतीचे चिन्ह म्हणून, यासोबत जोडावी.
१२. कायदेशीर काहि वाद झाले तर सर्व वाद लातूर न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येतील.
१३. किंमती केवळ भारतीय रुपयांमध्ये आणि नमूद केलेल्या संबंधित एककांमध्येच दर्शवाव्यात.
१४. पेमेंटच्या अटी: अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियमानु नुसार पूर्ण पेमेंट केले जाईल.
१५. निवड झालेल्या यशस्वी संस्थेला रु. ५०० किमतीच्या मुद्रांकावर करार करावा लागेल व अटी व शर्तीनुसार कार्यादेश स्वीकारण्याबाबत या कार्यालयासोबत करारावर स्वाक्षरी करावी लागेल.
१६. कामाची व्याप्ती आणि देय सेवा या दस्तऐवजाच्या परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या आहेत.
१७. काम पूर्ण झाल्यावर,सेवेच्या पुरवठा कामाचे अंतिम कर-बीजक (Tax Invoice) ३ प्रतीं मध्ये सादर करावे.
१८. राज्य सरकार किंवा भारत सरकारने असा कर, शुल्क किंवा उपकर नव्याने लागू करून अधिसूचित केला नसेल, तर कोणत्याही परिस्थितीत आमचे द्वारे निविदाकाराला कोणताही अतिरिक्त कर, शुल्क, उपकर इत्यादी देय राहणार नाहीत.
१९. विहित तारखेला किंवा त्यापूर्वी डिलिव्हरेबल्ससह ऑडिट पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास, प्रति आठवडा / त्याच्या भागासाठी करार किमतीच्या मूल्याच्या ०.५% इतका दंड आकारला जाईल, जो एकूण करार मूल्याच्या ५% पर्यंत मर्यादित असेल.
२०. विहित कालावधीच्या १५ दिवसांपेक्षा जास्त आदेशाचे पालन करण्यास विलंब झाल्यास, सदर कामापोटी दिलेले आदेश रद्द करण्याचा अधिकार आहे.
२१. निविदा सादर करताना सर्व आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे व कराराच्या अटींचे पालन करणे बंधनकारक आहे.
२२. अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांना कोणत्याही टप्प्यावर सदर दरपत्रकात बदल / रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

**निविदा प्रस्ताव लिफाफ्यात जोडायच्या दस्तऐवजाचा छायाप्रत लिफाफा क्र -१ (तांत्रिक लिफाफा)**

- माहिती सुरक्षा ऑडिटसाठी केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र शासन CERT-च्या पॅनेलवर नोंदणीकृत संस्था असलयाचे प्रमाणपत्र.
- संक्षेचे अथवा संस्थाचलकाचे PAN कार्ड. / पॅन कार्डची छायाप्रत
- GST नोंदणी प्रमाणपत्र व मागील तिमाहीचा विवरण सादर बाबत पुरावा (GSTR-3B)
- दरपत्रकातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे व यापूर्वी केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र शासनाच्या काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा पुरवठा करण्यापासून प्रतिबंधित केलेले नाही, याचे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र (नमुना-१ प्रमाणे) .

**निविदा प्रस्ताव लिफाफ्यात जोडायच्या दस्तऐवजाचा लिफाफा क्र - २ (दराचा लिफाफा)**

- किंमत प्रस्ताव (करांसह) Bill of Quantity (BoQ)
  किंमतपत्रक. BoQ दिलेल्या नमुन्यात प्रिंट काढून स्वाक्षरीसहित सादर.

**अंतिम प्रस्ताव लिफाफा ३ बाबत सूचना :**

- लिफाफा १ आणि लिफाफा २ हे सीलबंद करून लिफाफा ३ मध्ये पॅक करावेत. लिफाफा ३ वर संकेतस्थळांची सायबर सुरक्षा लेखापरीक्षणासाठी ई-दरपत्रक आमंत्रण सूचना. संदर्भ जावक क्रमांक आणि दिनांक नमूद करून तो कार्यालय अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे पाठवावा. हा लिफाफा या दस्तऐवजात नमूद केलेल्या अंतिम तारखेला आणि वेळेपूर्वी सादर करावा.

- संपूर्ण प्रस्ताव सीलबंद लिफाफ्यात, वरील पत्त्यावर स्पीड पोस्ट / कुरिअरद्वारे देखील सादर करता येईल. तथापि, स्पीड पोस्ट / कुरिअर इत्यादीमुळे होणाऱ्या कोणत्याही विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही आणि केवळ तेच प्रस्ताव मूल्यांकनासाठी विचारात घेतले जातील, जे वर नमूद केलेल्या दिनांक आणि वेळेच्या आत या कार्यालयात पोहोचतील. अंतिम मुदतीनंतर किंवा ईमेल इत्यादीद्वारे पोहोचलेले प्रस्ताव तात्काळ नाकारले जातील. हे कार्यालय कारणे न देता कोणतेही कोटेशन नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, लातूर

**प्रत :**

१) **महाविद्यालय** कार्यालय मुख्य सूचना फलक, **विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर**
२) अध्यक्ष,संकेतस्थळ **समिती**, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर
वेबसाईटवर प्रकाशित करण्यासाठी



Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट-अ

(सदर दरपत्रक दस्तऐवजाच्या कामाचे विवरणासाठी खालील तांत्रिक तपशील दिलेले आहे.)

### उद्दिष्टे व देयके

- ISO व OWASP टॉप १० मानकांनुसार सुरक्षा लेखापरीक्षण.
- असुरक्षितता शोधणे व दुरुस्ती उपाय सुचविणे.
- Vulnerability Assessment Report, Penetration Test Report.
- अनुपालन पुनरावलोकन.
- एक दिवसाचे प्रशिक्षण सत्र.
- संकेतस्थळाच्या डिझाइन, पासवर्ड सुरक्षा, डेटा इनपुट, लॉगिंग, ऍक्सेस कंट्रोल तपासणी.
- SQL Injection, Directory Traversal, Cross-Site Scripting, Authentication हल्ले इत्यादी तपासणी.
- OWASP टॉप १० असुरक्षितता तपासणी.
- अंतिम अहवाल व सुरक्षा प्रमाणपत्र.

### तपासावयाच्या असुरक्षितता

- SQL Injection
- CRLF Injection
- Directory Traversal
- Authentication हल्ले
- Cross-Site Scripting (XSS)
- PHP Remote Script Vulnerability
- HTTP Injection
- Buffer Overflow
- Insecure Storage

### Audit Report मध्ये असावे

- लेखापरीक्षण संस्था व पत्ता
- लेखापरीक्षणाची तारीख व ठिकाण
- लेखापरीक्षण योजना
- वापरलेली साधने व तपासणी निकाल
- असुरक्षिततेचे वर्णन व जोखमीचे मूल्यांकन
- शिफारसी व उपाय योजना
- लेखापरीक्षणात सहभागी कर्मचारी माहिती.



Scanned with OKEN Scanner

**नमुना-१**

दरपत्रकातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे व यापूर्वी केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र शासनाच्या काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा पुरवठा करण्यापासून प्रतिबंधित केलेले नाही, याचे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र

प्रति,
**अधिष्ठाता,**
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, व रुग्णालय, लातूर

विषय : अटी व शर्ती मान्य असले बाबत व शासनाच्या काळ्या यादीत नाव नसले बाबतचे स्वयंघोषणापत्र...
संदर्भ : आपले जाहीर ई-दरपत्रक सूचना
जा.क्र. विदेशावैमला/ई. दरपत्रक / /२०२६ दि. /०८/२०२६.

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार या पत्राव्दारे स्वयंघोषणापत्र असे लेखी लिहून देतो/देते की मी श्री./श्रीमती ------------------------------------------------------------------------------------ /मालक/चालक. माझे व माझ्या संस्थेचे नाव राज्यशासन/केंद्र शासनाच्या कोणत्याही कार्यालयाच्या/विभागाच्या काळ्या यादीत नमूद नाही व माझेवर व माझ्या संस्थेवर कसल्याही प्रकारचा गुन्हा नोंद नाही व तसा कोणताही गुन्हेगारी स्वरुपाचा खटला प्रलंबित नाही.

तसेच असे आढळुन आल्यास माझे हे दरपत्रक रद्द करण्यात येईल याची मला माहिती आहे. तसेच आपल्या ई-दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती मी काळजीपुर्वक वाचल्या असून मला त्या पुर्ण मान्य आहेत व त्याबद्दल माझी काही तक्रार नाही.

सबब हे शासनाच्या काळ्या यादीत नाव नसले बाबत व अटी व शर्ती मान्यअसले बाबत चे स्वयंघोषणापत्र.

आपले विश्वासु,

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का
ठिकाण :
दिनांक :



Scanned with OKEN Scanner